नवराष्ट्र

## डॉक्टरांनी केली यशस्वी शस्त्रक्रिया

# महिलेच्या मानेतून १ किलो वजनाची काढली गाठ

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. लीलावती हॉस्पिटलमध्ये एका 33 वर्षीय महिलेच्या मानेतून 1 किलो वजनाची थायरॉईड गाठ काढण्यात डॉक्टरांना यश मिळाले आहे. रुग्णालयातील थायरॉईड आणि एंडोक्राइन सर्जन डॉ. रितेश अग्रवाल, कार्डियाक सर्जन डॉ. कृष्णा प्रसाद आणि ईएनटी सर्जन डॉ. प्रीती धिंग्रा यांच्या नेतृत्वाखाली एका टीमने ही यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे. साधारणतः पाच तास ही शस्त्रक्रिया सुरू होती. या शस्त्रक्रियेत डॉ. वैभवी बक्षी यांनी रुग्णाला योग्य भूल दिली. प्रिशा शेट्टी (नाव बदललेले) या



पुण्यातील रहिवाशी आहेत. या महिलेला गेल्या 2 वर्षांपासून तीव्र श्वसनचा त्रास जाणवत होता. अनेक डॉक्टरांकडून उपचार घेतले. परंतु, प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. महिलेची बिघडती प्रकृती लक्षात घेता कुटुंबियांनी त्यांना मुंबईतील लिलावती रुग्णालयात दाखल केले. याठिकाणी वैद्यकीय चाचणीनंतर महिलेच्या मानेमध्ये गाठ असल्याचं दिसून आले. त्यानंतर एक्स-रे, सीटी स्कॅन आणि थायरॉईड फंक्शन चाचण्या करण्यात आल्या. त्यानंतर महिलेवर शस्त्रक्रिया करण्यात आली.

**छातीचे हाड न कापता फक्त मानेपासून शस्त्रक्रिया**

लिलावती रुग्णालयातील थायरॉईड आणि एंडोक्राइन सर्जन डॉ. रितेश अग्रवाल म्हणाले की, गॉइटर ही एक अशी स्थिती आहे जिथे गाठी तयार झाल्यामुळे किंवा सूज वाढल्याने थायरॉईड ग्रंथीची वाढ होते. या महिलेला थायरॉईड ग्रंथी वाढून गलगंड झाले होते. या भागात गाठी असतात, तेव्हा ते श्वसननलिकेवर दाब येतो ज्यामुळे योग्य ऑक्सिजन पुरवठा होत नाही आणि रुग्णांना श्वासोच्छ्वासाच्या समस्यांना सामोरे जावे लागते.